# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी स्तरावरील रिक्त पदांच्या भरती प्रक्रियाबाबत.

### -:सुचना:-

दिनांक २५/०८/२०२३

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी स्तरावरील कंत्राटी रिक्त पदांकरिता राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रियेतील उमेदवारांच्या प्रवर्गनिहाय अंतिम निवड व प्रतिक्षा यादया दि.०७/०८/२०२३ रोजी जिल्हा परिषद अहमदनगरच्या संकेतस्थळावरती प्रसिध्द करण्यात आलेल्या असुन सदर निवड झालेल्या उमेदवारांचे मुळ कागदपत्रांची तपासणी व समुपदेशनाने पदस्थापना देणेकामी **ठिकाण – छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, ४ था मजला, जिल्हा परिषद अहमदनगर येथे दिनांक २९/०८/२०२३ रोजी सकाळी ठीक ११ वाजता** समक्ष आपल्या मुळ दस्तऐवजासह उपस्थित रहावे. उमेदवाराने अर्ज करतांना सादर केलेल्या सत्यप्रति व मुळकागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड रदद करुन पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

समुपदेशनासाठी उमेदवार गैरहजर राहिल्यास मुळ कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहुन समुपदेशनानंतर शिल्लक जागेवर गैरहजर उमेदवारांना पदस्थापना देण्यात येईल व त्याबाबत सदर उमेदवारास कुठलीही हरकत घेण्यास वाव असणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अमोल शिंदे)
**जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
**जिल्हा परिषद, अहमदनगर**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
अध्यक्ष जि.ए.आ.कु.क.सो.यांचे मान्यतेने.